तळपण रस्त्याच्या दुतर्फा असलेला झाडी कापण्यात येत आहे.

# हिंदुस्थान मोटर्सतर्फे आज ॲम्बेसिडर 'रॅली'

मडगाव, ता. २ (प्रतिनिधी) : हिंदुस्थान मोटर्सतर्फे ॲम्बेसिडर वाहनांच्या 'रॅली'ला उद्या (ता.३) सकाळी ८ वाजता बाणावलीतील बे-वॉच तारांकित हॉटेलपासून सुरवात होणार आहे. या 'रॅली'त कंपनीच्या २५ ॲम्बेसिडर गाड्या सहभागी होणार असल्याची माहिती सरव्यवस्थापक राजीव सक्सेना यांनी पत्रकार परिषदेत दिली. ही रॅली कारवारमार्गे कर्नाटक राज्यातून केरळहून तमिळनाडूपर्यंत जाणार आहे. युरोपातील ॲडव्हेंचर आश्रम व इंग्लंडचे रेन्बो चॅरिटी यांचे सहकार्य लाभले आहे. या 'रॅली'त विदेशी पर्यटक सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले. भारतात ॲम्बेसिडर गाड्या अजूनही रस्त्यावर चालतात, हे दाखवण्यासाठी 'रॅली'चे आयोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले. भारतात हिंदुस्थान मोटर्सने वाहन उद्योगाचे सर्व्हेक्षण केले असून नवीन मॉडेल्स लोकांच्या पसंतीस येत असल्याचे आढळून आले आहे. कंपनीतर्फे लवकरच नवीन मॉडेल्सच्या गाड्या बाजारपेठेत येणार आहेत.